तात्काळ:
======

प्रथम मान्यता

(5)

जा.क्र. माध्य-३/ ९३ /अमाशा/पुवि/२०००-०१
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग
पुणे-१ यांचे कार्यालय
दिनांक:-

19 JUL 2001

प्रति,
सचिव,
अमरज्योत तरुण मंडळ
शिक्षण संस्था,
इंद्रायणीनगर
भोसरी, पुणे.

विषय : २०००-२००१ या शैक्षणिक वर्षात नविन माध्यमिक शाळांना परवानगी देण्याबाबत.

संदर्भ : १] शासनपत्र क्र. नम शा/~~२०००/४२०/२०००/मा~~ २०००/(८४६)/२०००
मा‍शि-१ दि. ७ जून २००१
२] मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे
यांचे पत्र क्र. अमाशा/१०२ के/नमाशा/६५१७०
१५क, दिनांक २८.९.२०००

उपरोक्त विषयाबाबतच्या संदर्भिय पत्रान्वये आपणांस कळविण्यात येते की, खाली दिलेल्या शैक्षणिक संस्थांना त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षात कायम विनाअनुदान/~~विनाअनुदान~~ तत्वावर नविन माध्यमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्याबाबतचा प्रस्ताव या कार्यालयाच्या विचाराधिन आहे.

| अ.क्र. | शैक्षणिक संस्थेचे नांव | ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|---|
| १ | अमरज्योत तरुण मंडळ, शिक्षण संस्था इंद्रायणीनगर, भोसरी, पुणे | इंद्रायणीनगर भोसरी, पुणे | ८वी | इंग्रजी |

१अ] इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळेसाठी भविष्यकाळात शासनाकडून कोणत्याही प्रकारे अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही किंवा विद्यार्थ्यांच्या फी च्या प्रतिपूर्तीची मागणी करण्यात येणार नाही अशा आशयाचे संस्थेच्या अध्यक्षांच्या सहीचे लेखी हमीपत्र सादर करावे.

१ब] या नविन माध्यमिक शाळांना शासनाने कायम विनाअनुदान तत्वावर मंजूरी देण्यात आली असून भविष्यात कधिही अनुदान तसेच कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत देण्यात येणार नाही.

१क] या नविन माध्यमिक शाळांना शासनाने विहित केलेल्या सूत्रानुसार अनुदान अनुज्ञेय राहील.

२] सदर माध्यमिक शाळांना शासनाच्या वेळोवेळी निघणाऱ्या आदेशाचे [उदा. विद्यार्थ्यां च्या प्रवेशाबाबत] काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

३] सदर ~~माध्यमिक~~ संस्थांची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे.

४] संबंधित संस्था, मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० अगर केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत आहे.

५] संस्था विरुद्ध गंभीर स्वरूपाच्या तक्रारी नाहीत.

६] सदर संस्थेने चालविलेल्या शाळापैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.

७] संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालक असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबत एखादे प्रकरण प्रलंबीत नाही.

८] सदर संस्थेमार्फत शाळा सुरु करण्यासाठी सादर केलेल्या प्रस्तावांच्या संदर्भात कोणत्याही न्यायालयांत दावा चालू नाही.

Principal
SHRI SWAMI SAMARTH
ENGILISH MEDIUM SCHOOL (PRIM.)
INDRAYANI NAGAR, BHOSARI, PUNE - 411 026

....

कायम विनाअनुदानित

प्रति,

शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, पुणे.

जा.क्र. माध्य.३(१४)/प्रथम मान्यता/पुवि/२००१
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे - १ यांचे कार्यालय.
दिनांक : 18 JUL 2002

विषय : प्रथम मान्यता...
श्री. स्वामी समर्थ इंग्लिश मिडीयम स्कूल, इंद्रायणीनगर

संदर्भ : १. आपले पत्र क्रमांक शिक्षण/ माध्य/ई-४/ ९ .मा/ ०१-०२, दि. १.८.२००१
२. शा.प.क्र. माध्य-१०००/ [६५९/ २०००] माशि-१, दि. १४.६.२००१
३. माध्य-/१४८ मान्यता/ मान्यता/ पुवि/ २००१, दि. ६.११.२००१

वरील संदर्भिय पत्रान्वये कळविण्यांत येते की, माध्यमिक शाळा संहिता नियम ३.१, ३.२ व ३.३ अन्वये अमरज्योत शिक्षण मंडळ शिक्षण संस्था, इंद्रायणीनगर, भोसरी, पुणे संस्थेच्या श्री. स्वामी समर्थ इंग्लिश मिडीयम स्कूल, इंद्रायणीनगर व भोसरी माध्यमिक शाळेच्या इयत्ता ८वी च्या वर्गास २०००-२००१ या शैक्षणिक वर्षासाठी जून २००० पासून प्रथम मान्यता देण्यात येत आहे. सदर मान्यता खालील अटींची पूर्तता अधिन राहून देण्यांत येत आहे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी खालील अटींची पूर्तता शाळा करित आहे किंवा कसे याची तपासणी करुन पुढील मान्यतेच्या वेळी प्रस्ताव पाठवितांना खालील अटी पूर्ण केलेल्या आहेत किंवा कसे याची तपासणी करुन पुढील मान्यतेच्या वेळी प्रस्ताव पाठवितांना खालील अटी पुर्ण केलेल्या आहेत किंवा कसे याबाबतही अहवाल प्रस्तावासोबत पाठविण्यांत यावा.

१. संस्थेने स्वतःच्या मालकीची शैक्षणिकदृष्ट्या योग्य व पुरेशी इमारत उपलब्ध करुन घ्यावी.
२. मुख्याध्यापक पदी पात्र व अनुभवी व्यक्तीची नेमणूक करावी.
३. स्वतंत्र व विषयवार प्रयोगशाळा सर्व साहित्यानिशी उपलब्ध करुन घ्यावी.
४. स्वतंत्र ग्रंथालयाची सोय उपलब्ध करुन दरवर्षी अधिक ग्रंथांची भर घालावी.
५. विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात पुरेसे फर्निचर व शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन घ्यावे.
६. पुरेसा प्रशिक्षित शिक्षक वर्ग उपलब्ध करुन घ्यावा.
७. स्वतंत्र स्वच्छतागृहाची सोय उपलब्ध करुन घ्यावी.
८. वाढीव फी चे दर मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडून मंजूर करुन घ्यावेत.
९. शालेय रेकॉर्ड माध्यमिक शाळा संहिता नियमाप्रमाणे ठेवून त्यात अद्ययावत नोंदी घेण्यात याव्यात.
१०. कर्मचा-यांना सरकारी वेतनश्रेणी नुसार वेतन अदा करावे.
११. शिक्षकांची भविष्य निर्वाह निधी खाती उघडावीत.
१२. विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करावी.
१३. तपासणी अहवालातील सुचनांची पूर्तता करावी.
१४. पालक शिक्षक संघाची स्थापना करावी.
१५. विद्यार्थ्यांसाठी संगणक सुविधा उपलब्ध करावी.
१६. विद्यार्थी संख्या वाढवावी.
१७. सोबतच्या त्रुटींची पूर्तता करण्याच्या अटीवरच सदरची प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

मूळ प्रतीवर शिक्षण उपसंचालक यांची स्वाक्षरी आहे.

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१करिता

प्रत :
मुख्याध्यापक, श्री. स्वामी समर्थ इंग्लिश मिडीयम स्कूल, इंद्रायणीनगर, भोसरी, पुणे.

Principal
SHRI SWAMI SAMARTH
ENGILISH MEDIUM SCHOOL (PRIM.)
INDRAYANI NAGAR, BHOSARI, PUNE - 411 026

[redacted]
कायम विनाअनुदान तत्वावर

प्रथम मान्यता (5)

(3)

2 ६७

जा.क्र प्राशि/खाप्राशा/वर्ग-तुकडी/मंजूरी/पुवि/०१
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक 13 DEC 2001

प्रति,

शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद,
२. शिक्षण प्रमुख,
महानगरपालिका शिक्षण मंडळ,
जुना तोफखाना, शिवाजीनगर, पुणे-५.
३. प्रशासन अधिकारी,
महानगरपालिका/[redacted] शिक्षण मंडळ, पिंपरी-चिंचवड, पुणे-१८.

विषय : मान्यताप्राप्त [redacted] कायम विनाअनुदानित खाजगी प्राथमिक शाळेस सन २०००-०१ या शैक्षणिक वर्षी नैसर्गिक [redacted] वाढीचा [redacted] प्रथम [redacted] वर्ग/[redacted] मंजूर करणेबाबत.

संदर्भ : प्राथमिक शिक्षण संचालनालयाचे क्र. खाप्राशा/२०००/तुमा-२/६०७३२/ड-१ ५१२, दिनांक २१.११.२००१.

वरील विषयासंबंधीचा आपणाकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावाचा विचार करता उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये खाली नमूद केलेल्या शाळेस त्यांचे नावासमोर दर्शविण्यात आलेल्या नैसर्गिक/[redacted] वाढीचा/[redacted] प्रथम/[redacted] वर्ग/[redacted] कायम विनाअनुदान तत्वावर जून, २००० पासून सन २०००-०१ या शैक्षणिक वर्षापासून खाली दर्शविण्यात आलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहे/[redacted]

| अ.क्र. | शाळेचे नांव | माध्यम | इयत्ता | वर्ग/तुकडी वाढ नैसर्गिक/अतिरिक्त |
|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. |
| १. | श्री. स्वामी समर्थ इंग्लिश मेडीयम स्कूल, इंद्रायणी नगर, पुणे. | इंग्रजी | इ. ५ वी ते ७ वी चा प्रथम वर्ग | नैसर्गिक |

अटी व शर्ती.

१. ज्या शाळांना जून, २००० पासून विनाअनुदान तत्वावर वर्ग/तुकडया मंजूरी देण्यात आलेली आहे या वर्ग/तुकडया भविष्यात जून, २००४ पासून अनुदानास पात्र ठरविताना शासन निर्णय क्रमांक-पीएलएस-१०००/(२४५५)/प्राशि-१, दिनांक ८.११.२००० मधील अटी व निकषांचा अवलंब करावा व अनुदानास पात्र ठरणा-या या वर्गाला/तुकडयांना आवश्यक असणारी आर्थिक तरतूदीची मागणी जिल्हा नियोजन समितीकडे त्यावेळी उपलब्ध करुन घेण्याची दक्षता संबधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद/शिक्षण प्रमुख, महानगरपालिका शिक्षण मंडळ/प्रशासन अधिकारी, महानगरपालिका/नगरपालिका शिक्षण मंडळ यांनी घ्यावी.
२. शाळेत शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारीवृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तीच्या अधिन राहून नेमला पाहिजे.
३. सदर शाळेने वर्ग/तुकडयासाठी सर्व भौतिक, शैक्षणिक व व्यवस्थापन विषयक सुविधा उपलब्ध करुन घ्याव्यात.
४. सदर शाळेत स्वच्छतागृहाची व पिण्याच्या पाण्याची सुविधा चांगली असणे आवश्यक आहे.
५. शाळेने शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे.
६. सदर मंजूर करण्यात येणा-या वर्ग/तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यताप्राप्त खाजगी प्राथमिक शाळेतील पट व उपस्थितीवर विपरीत परिणाम होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.
७. सदर शाळेच्या मंजूर करण्यात आलेल्या या वर्ग/तुकडीत विद्यार्थी संख्या कायम पुरेशी असणे आवश्यक आहे.
८. तपासणीअंती एक जरी अट अथवा शर्त नियमाप्रमाणे [illegible] आल्यास वर्ग/तुकडी मंजूरी रद्द करण्यात येईल.

स्वाक्षरीत शि. उ. सं. यांची
सही असे.

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग,पुणे-१

प्रत
माहितीस्तव सविनय सादर
१. मा. प्राथमिक शिक्षण संचालक, प्राथमिक शिक्षण संचालनालय...
२. मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका, श्री ...

Principal
SHRI SWAMI SAMARTH
ENGILISH MEDIUM SCHOOL (PRIM.)
INDRAYANI NAGAR, BHOSARI, PUNE - 411 026

Head Master
SHRI SWAMI SAMARTH
ENGLISH MEDIUM SCHOOL (SECON)
Indrayaninagar, Bhosari, Pune-411026

Principal
SHRI SWAMI SAMARTH
ENGILISH MEDIUM SCHOOL (PRIM.)
INDRAYANI NAGAR . BHOSARI . PUNE - 411 026